# सेवक वार्ता

**सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र**

**डिसेंबर-२०२१** **वर्ष -३, अंक-२**

**कार्यालय -** संत एकनाथनगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कौंप्युटर ट्रेनिंग सेंटर , बिबवेवाडी,, पुणे - ४११०३७


### कन्हारगाव अभयारण्य व्यवस्थापन आराखडा अपडेट ......

कन्हारगाव अभयारण्याचा पहिला व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी गठीत चमूची आढावा बैठक पुणे येथे श्री. वि. त्र्यं.पत्की यांचे निवासस्थानी दि.११ /१२/२१ झाली. बैठकीस आराखडाकार सर्वश्री विश्वास सावरकर, वि. त्र्यं. पत्की अजय पिलारीसेट, संजय जगताप, संभाजी गवळी, प्रदिप कुलकर्णी उपस्थित होते. बैठकीत प्रकरणनिहाय लिखाणाचा आढावा घेवून वन्यजीव व्यवस्थापनाची ध्येये, रणनिती इ. बाबी निश्चित करण्यात आल्या.

----------oooo------------------

### कॅम्पा अंतर्गत रोपवनांचे मुल्यांकन काम पूर्ण .....

शिल्लक ४७ कामांचे मूल्यांकन काम दसरा ते दिवाळी या दरम्यानच्या कालावधीमध्ये पूर्ण केले. ही कामे ठाणे, धुळे, पुणे, अमरावती, यवतमाळ,नागपूर या वनवृत्तामध्ये असून त्यांचे एकूण क्षेत्र ६१९ हेक्टर आहे. त्याचा अहवाल तयार करून सादर करण्यात येईल. सदरच्या मुल्यांकन कामासाठी ९ सेवक सदस्यांची चमू बनवण्यात आली ज्यात सर्वश्री एस. के.गवळी, पी. के. कुलकर्णी, आर. टी. मोरे, उमेश धोपेश्वरकर, बी.व्ही.सेलुकर, टि.आर. नंदेश्वर, के.ओ.सेमस्कर जी.एस.खांडेकर व मधुकर पाटोळे यांचा समावेश होता. श्री. विठ्ठल पत्की यांचे मार्गदर्शनाखाली व नियोजनुसार हे काम पूर्ण करून अहवाल मुकाअ, महाकॅम्पा यांना सादर करण्यात आला आहे.



**नूतन वर्ष २०२२ साठी सर्व सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ सदस्यांना हार्दिक शुभेच्छा**

### कार्यकारी मंडळ बैठक वृत

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या दि.७-१२-२०२१ रोजीच्या आभासी बैठक झाली नाही.सबब वृत्तांकन नाही.

------------------------------

### सेवक विशेषांक ......

सेवक विशेषांक संबंधात बैठक श्री. वि. त्र्यं.पत्की, निवासस्थानी दि.१२ /१२/२०२१ रोजी सेवक सदस्य सर्वश्री मदन कुलकर्णी, वि. त्र्यं. पत्की, अरविंद आपटे, पी बी धानके यांची बैठक झाली.
बैठकीत विशेषांकातील लेखांची पाने १०० पर्यंत मर्यादित ठेवण्यावर निर्णय घेण्यात आला.

----------------oo-------------

### सेवक संघ विशेष वृत्त.

**श्री.गडपांडे सेवक संघ अमरावती शाखेचे नवे अध्यक्ष**

सेवक संघाचे आजीवन सदस्य श्री. डी.एस.गडपांडे यांची सेवक संघ अमरावती शाखा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली असून श्री.अ.वि. कविटकर यांचा राजीनामा स्विकृत करण्यात आला आहे.

या अंकात . . . . .


१. कन्हारगाव अभयारण्याचा आराखडा....१
२. कॅम्पा निधी अंतर्गत रोपवनाचे ............१
मूल्यांकन काम
३. सेवक संघ नोंदणीकृत कार्यालय बदलले..१
४. सेवक विशेषांक संबंधात बैठक ............१
५. सेवक संघ,उपविधीची ओळख ............. १
६. सेवक संघ विशेष वृत्त .. ... .... ............१
७. निधन वार्ता ... ..... ......... २


### सेवक संघ महाराष्ट्रचे नोंदणीकृत कार्यालयात बदल झाला असून तात्पुरता पत्ता -

वि. त्र्यं.पत्की, (दूर.९८२२६७८६४९)
संत एकनाथनगर, भाग-१
'यशोपर्व', एनव्हीजन कौंप्युटर ट्रेनिंग सेंटर , बिबवेवाडी, पुणे- ४११०३७

******************************

### सेवक संघ विशेष वृत्त.

### सेवक संघ,उपविधीची ओळख

**सेवक संघ, महाराष्ट्रचा सुधारीत उपविधी (भाग - ८)**

१६.३) अ) कार्यकारी मंडळातील सभासदांच्या खालीलप्रमाणे समित्या सुरवातीस नेमता येतील.
अ) व्याख्यान समिती.
ब) करमणूक समिती.
क) नियोजन समिती.
ड) तांत्रिक समिती.
इ) सहल समिती.
फ) सांस्कृतिक कार्यक्रम समिती.
या व्यतीरीक्त इतर विषयांवर समित्या कार्यकारी मंडळास नमता येतील.या समित्यांवर सभासदांपैकी अथवा तज्ञ नियुक्त करता येतील.
ब)समित्यांचे अहवालावर चर्चा करून कार्यक्रमाचे नियोजन करून कार्यक्रम कार्यान्वित करणे.

१७)संघाचा निधी, मिळकत विनियोग:

१७.१) संघाच्या निधीमध्ये प्रवेश शुल्क, वर्गण्या, देणग्या, अनुदाने, संघाने स्वीकारलेल्या कामापोटी मिळालेल्या शुल्क रकमेतून ऐच्छिक देणगी आणी वृत्तस्तरावर प्राप्त झालेल्या महसुलातून खर्च वजा जाता राहिलेल्या रकमेची २०% रक्कम यांचा समावेश राहील.

१७.२) निधीचा विनियोग कार्यकारी मंडळाचे सभेत ठरविला जाईल.

१८) उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद: वार्षिक सर्वसाधारण सभेत पुधील वर्षाचे अंदाजपत्रक मंजूर करून घेतले जाईल व त्याप्रमाणे खर्च करण्यात येईल. अंदाजपत्रकामध्ये नसलेल्या बाबींवर कार्यकारी मंडळ खर्च करू शकेल.

१९) कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद:ठेवी मुदतीने राष्ट्रीयकृत बँकेत अगर सहकारी बँकेत अगर धर्मदाय आयुक्तांनी मान्य केलेया संस्थेत ठेवण्यात येतील.

२०) स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे:

संघाची स्थावर मिळकत जरूर असेल त्याप्रमाणे विकत घेतली जाईल. यावरील देखरेख वापराचे नियम कार्यकारी मंडळ करेल.

२१) संस्थेचे व वृत्तस्तरीय शाखेचे बँक व्यवहार:

२१.१) संघाचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत अगर सहकारी बँकेत उघडण्यात येईल. बँक व्यवहार कार्यकारी अध्यक्ष, कार्यवाह व कोषाध्यक्ष यापैकी कोणत्याही दोघा पदाधीकाय्रांच्या स्वाक्षरीने केला जाईल.

२१.२) वृत्तस्तरीय शाखांचे बँक व्यवहार सहअध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यवाह व कोषाध्यक्ष यापैकी कोणत्याही दोघा पदाधीकाय्रांच्या स्वाक्षरीने केला जाईल.

२२) सभासदांची यादी:

सन १८६० चे संथा नोंदणी अधिनियमांचे नियम १५प्रमाणे जे संघाचे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१चे संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम अनुसूची १६ या नमुन्यात ठेवण्यात येईल.

२३) नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतूद:

संघाचा दैनदिन कारभार योग्य रीतीने चालविण्यासाठी नियम करण्याचा व त्यात वेळोवेळी बदल वा सुधारणा करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेस राहील. मात्र असे नियम व त्यातील सुधारणा मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० अथवा मु. मा. वी. म. नियम १९५१च्या तरतुदींशी विसंगत असता कामा नये. अशा रीतीने तयार केलेल्या नियमांची एक प्रत कार्यकारी मंडळाच्या दोन पदाधिका-यांच्या स्वाक्षरीने त्या धर्मदाय आयुक्तांचे पुण्यातील प्रतिनिधीकडे पाठवून, त्यांचे कार्यालयाची पोचपावती घेतली जाईल. अन्यथा तो नियम अमलात येणार नाही.


२४) संघाच्या नावात व उद्देशात बदल:

संघाच्या नावातील बदल व उद्देशात्त समयानुसार फेरफार करता येतील व तसा बदल करावयाचा असेल तर सन १८६०चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १२ व १२ (ब) प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२५) संघाचे विसर्जन:

संघाचे विसर्जन करणे झाल्यास सन १८६०चे संथा नोंदणी अधिनियमांतील नियम १३ व १४ यातील तरतुदीनुसार करण्यात येईल. त्यावेळी संघाची जी स्थावर, जंगम मिळकत असेल ती सर्व मिळकत संघाने ठरविलेल्या उद्देशांचे पूर्तीसाठी पुणे महानगर पालिका हद्दीतील दुस-या संघात अगर संस्थेत विलीन करण्यात येईल.उपरोक्त नियम व नियमावली अधीक्षक, सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयाने दि. २१.१०.२०१६ रोजी प्रमाणित केली व त्यावर संस्थेचे अध्यक्ष, कार्यवाह व उपाध्यक्ष यांनी संमतीदर्शक स्वाक्ष-या केल्या.

## निधन वार्ता



* सेवक संघाचे आजीवन सदस्य व नाशिक शाखेचे माजी अध्यक्ष एच. के. ठाणेदार,सेनि.सहा.वन संरक्षक, यांचे दि.२२-१२-२०२१रोजी नाशिक येथे ह्रदयविकाराने दु:खद निधन झाले. त्यांना सेवक संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !

त्यांना श्रध्दांजली वाहतांना संघाचे जेष्ठ सदस्य श्री.पत्की म्हणाले,

**" I am shocked to learn the sad news. A genuine gentle man, honest and sincere forest officer, excellent in drafting reports, sweet tongued personality. His death has created vacuum in SEVAK. My deep condolences to his family members."**

---

श्री. व्ही. एन. गायकवाड, सहा. वन संरक्षक, सामा. वनीकरण, विभाग औरंगाबाद, यांचे दि.२५-१२-२१ रोजी औरंगाबाद येथे दु:खद निधन झाले. त्यांना सेवक संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !

---

---

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी